
‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद’– कर्मवीर रयत शिक्षण संस्थेचे,

# रयत शिक्षण संस्था सातारा, शेरखान बी.एन.पी. पारिबास



Sharekhan by BNP PARIBAS  BNP PARIBAS आयोजित

# शिवचरित्र चित्रकाव्य प्रदर्शनास भेट



## संगीत शिवस्वराज्यगाथा

**बोरिवली सांस्कृतिक केंद्राच्या संयुक्त विद्यमाने**
**सईशा प्रोडक्शन्स मुंबई निर्मित व प्रस्तुत**

# शिवसंस्कार काव्यदालन

शिवचरित्रावर आधारित 3 दिवसीय १०० चित्रकाव्यांचे भव्य दालन २२ डिसेंबर संध्याकाळी ५ वा. ते ९ वा. आणि २३ व २४ डिसेंबर सकाळी १० वा. ते ९ वा.

विशेष सहकार्य : **डॉ. महेश अभ्यंकर सर** (मुख्य समन्वयक ग्रंथ तुमच्या दारी व डायरेक्टर)

आपले स्नेहांकित

| परिणिता माविनकुर्वे मॅडम | मा. श्री. प्रा. संदिप पिसाळ सर | मा. श्री. घनश्याम देटके |
|---|---|---|
| सल्लागार – आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठान | सचिव – आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठान | अध्यक्ष – आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठान |

शनिवार दिनांक : २३/१२/२०२३ * वेळ : ८.०० ते २.००

**स्थळ: ज्ञानसागर ॲंफिथिएटर, ब्रह्मकुमारी गार्डन, बोरिवली (प)**

## ॥ सहभागी शाळा ॥

- रयत शिक्षण संस्थेचे ज्ञानवर्धिनी विद्यालय (चारकोप)
- रयत शिक्षण संस्थेचे प्रा. डॉ. एन. डी. पाटील विद्यालय (सह्याद्री नगर)
- प्रगती विद्यालय (गोराई),
- प्रियदर्शिनी विद्यामंदिर (चारकोप)
- ज्ञानेश्वरी विद्यामंदिर (बंदरपाखाडी),
- हिंल्डा कॅस्टेलिनो मराठी हायस्कूल (लालजीपाडा)


JAIMIN
शिवचरित्र चित्रकाव्य प्रदर्शनास भेट
शिवसंस्कार काव्यदालन
MH.47
AS.1140
cityflo
C612


JAIMIN
शिवचरित्र चित्रकाव्य प्रदर्शनास भेट
शिवसंस्कार काव्यदालन
MH.47
AS.1140


JAIMIN
cityflo
MH-47
AS.1140


JAIMIN
शिवसंस्कार काव्यदालन
संगीत शिवस्वराज्यगाथा
MK.47
AS.1140
cityflo
C612


JAIMIN
BHAYANDAR
cityflo
C612
रयत शिक्षण संस्था सातारा, शेरखान बी.एन.पी. परिवार
शिवचरित्र चित्रकाव्य प्रदर्शनास भेट
शिवसंस्कार काव्यदालन
संगीत
शिवस्वराज्यगाथा
MH.47
AS.1140


॥ शिवसंस्कार ॥
हिंदवी स्वराज्याचा ॥

पुण्य नगरी

# शिवसंस्कार काव्यदालनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**मुंबई :** सईशा प्रोडक्शन्स मुंबई आणि बोरिवली सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्यांदाच बोरिवलीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवचरित्र या विषयांना संपूर्णतः वाहिलेल्या ३ दिवसीय भव्य अशा उपक्रमाचे ३५० वा शिवराज्याभिषेक वर्षसोहळ्यानिमित्त आयोजन करण्यात आले होते.

२२ ते २४ डिसेंबर या ३ दिवसांत शिवसंस्कार काव्यदालनाला १२ शाळांतील ६०० विद्यार्थी तसेच अनेक शिवप्रेमींनी आणि परिसरातील नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. शिवसंस्कार काव्यदालनाच्या माध्यमातून संपूर्ण शिवचरित्र, आपली संस्कृती, आपले गडदुर्ग, शिवकाळातील परिचित अपरिचित योद्धे आणि अशा सर्वच विषयांवर आधारित १०० काव्य अनिल नलावडे यांनी रचली होती. आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठानच्या वतीने हे काव्यदालन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांकरता खास बसची सोय केली गेली होती.

तसेच यानिमित्त भारतीय सैन्यातील मराठा लाईट इन्फेण्ट्री रेजिमेण्टल सेंटर, बेळगावचे कॅप्टन पी. विक्रम यांचे शिवचरित्रातून प्रेरणा आणि मराठा लाईट इन्फण्ट्री रेजिमेंण्टच्या २५० वर्षांच्या स्फूर्तिदायी इतिहासावर आणि कर्तृत्ववान कारकीर्दीवर व्याख्यान झाले. तसेच 'संगीत शिवस्वराज्यगाथा' या संपूर्ण शिवशाहीवर आधारित ४२ नवगीतांमधून साकारलेल्या धगधगत्या संगीतमय शिवचरित्राचे सादरीकरण झाले. गायक श्रीरंग भावे, नचिकेत देसाई, केतकी भावे-जोशी यांनी या नवगीतांचे सादरीकरण केले तर आपल्या ओघवत्या शैलीतील शिवचरित्र कथन संचालिका, दिग्दर्शिका, निवेदिका पद्मश्री राव यांनी केले. शिवकाव्यांचे सादरीकरण हे स्वतः संगीत शिवस्वराज्य गाथाचे लेखक, गीतकार, संगीतकार अनिल नलावडे यांनी केले.

Smart Mumbai Edition
Dec 27, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# बोरिवलीत शिवसंस्कार कार्यक्रम उत्साहात

कांदिवली, ता. २६ (बातमीदार) : बोरिवलीमध्ये सईशा प्रोडक्शन्स आणि बोरिवली सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवचरित्र या विषयांना संपूर्णतः वाहिलेल्या तीन दिवसीय भव्य अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ३५०व्या शिवराज्याभिषेक वर्षसोहळानिमित्ताने २२ ते २४ डिसेंबर दरम्यान शिवसंस्कार काव्यदालनला १२ शाळेतील सहाशे विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. तसेच अनेक शिवप्रेमींनी आणि परिसरातील नागरिकांनी शिवसंस्कार काव्यदालनाला चांगला प्रतिसाद दिला.

आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठान तर्फे हे काव्यदालन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता खास बसची सोय करण्यात आली होती. तसेच, यानिमित्ताने शनिवारी २३ डिसेंबर रोजी बेळगाव येथील कॅप्टन पी. विक्रम यांचे शिवचरित्रातून प्रेरणा आणि मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंन्टच्या २५० वर्षांच्या स्फूर्तिदायक इतिहासावर आणि कर्तृत्ववान कारकिर्दीवर व्याख्यान झाले.

उपस्थित तरुणांना त्यांनी भारतीय लष्करातील संधी, एनडीए, सीडीएसयाबद्दल सुद्धा माहिती दिली. तर रविवार २४ डिसेंबर रोजी 'संगीत शिवस्वराज्यगाथा' या संपूर्ण शिवशाहीवर आधारित ४२ नवगीतांमधून साकारलेल्या धगधगत्या संगीतमय शिवचरित्राचे सादरीकरण झाले.